# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७ / चैत्र २, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २९**

---

### दहिसर (मुंबई) येथील साई शिवाई फार्ममधून बनावट इनहेलरचा साठा जप्त केल्याबाबत

**(१) * ८२२५३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) येथील साई शिवाई फार्ममधून बनावट इनहेलरच्या ३५ कंटेनर्सचा साठा जप्त केल्याप्रकरणी आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन यांनी एमएचबी पोलिस ठाणे येथे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बनावट व अनधिकृतपणे औषधांचा साठा करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे मे. साई शिवाई फार्मा, दहिसर, मुंबई या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान सदर पेढीने मे. सिप्ला कंपनीच्या सेरोफ्लो इनहेलर १२५ (Seroflo Inhaler-१२५) या औषधाच्या खरेदीचे खरे तपशील न देता खोट्या खरेदी बिलांच्या प्रती सादर केल्या म्हणजेच सदर पेढीने बेकायदेशीररीत्या खरेदी केलेल्या औषधाचा साठा, विक्री, वितरण केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पेढीत तपासणीच्या वेळेस उपलब्ध असलेला सेरोफ्लो इनहेलर १२५ या औषधाचा ३५ कंटेनर साठा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी एम.एच.बी. पोलीस ठाणे, बोरीवली, मुंबई येथे पेढी मालकाविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० च्या कलम १७ (बी), १८ (सी) व नियम १०४ (अे) तसेच भा.द.वि. चे कलम ४६४ व ४६५ यांचे उल्लंघन केल्यासंदर्भात प्रथम खबर अहवाल क्रमांक २८/१७, दि. २५/०१/२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीसांमार्फत सुरू आहे. प्रशासनाव्दारे सदर पेढी मालकास दि. ०६/०२/२०१७ रोजी त्यांचे पेढीचे परवाने रद्द का करण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर नोटीशीचा खुलासा प्राप्त होताच नियमानुसार पुढील कारवाई घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजुरा तांडा (ता. मुखेड, जि. नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाल्याबाबत

**(२) * ७६८०८ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा तांडा (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील ३० विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून देण्यात आलेल्या खिचडीतून विषबाधा झाली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांवर उपजिल्हा रुग्णालय, मुखेड येथे उपचार सुरु असून ४ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, दि.०६/०१/२०१७ रोजी ३ विद्यार्थ्यांना बाहेरील अन्नपदार्थ खाल्याने उलटी व मळमळीचा त्रास झाला होता. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून २९ विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि.नांदेड येथे दाखल करण्यात आले होते. सदर त्रास शाळेच्या अन्नामुळे झाला नसल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांनी दिला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानिवली (ता.मुरबाड,जि.ठाणे) येथील टेक्नोक्राफ्ट कंपनीच्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे काळू नदीतील पाणी दुषित झाल्याबाबत

**(३) * ८२१४२ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानिवली (ता.मुरबाड, जि.ठाणे)ग्रामपंचायत हद्दीमध्ये टेक्नोक्राफ्ट या कंपनीच्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे काळू नदीतील पाणी दुषित होत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या व पशुपक्षांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने टेक्नोक्राफ्ट कंपनीवर व संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त नदी प्रदूषणमुक्त करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) तालुका आरोग्य अधिकारी, मुरबाड तसेच पशुधन विकास अधिकारी, मुरबाड यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार दुषित पाण्यामुळे नागरिक व पशुपक्षांच्या आजाराची तक्रार आढळून आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या दप्तरांचे वाटप केल्याबाबत**

**(४) * ७४१५६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांकरीता खरेदी केलेली दफ्तरे निकृष्ट दर्जाची असून सुमारे ३५०० विद्यार्थ्यांचे दप्तर फाटल्याचे चौकशी अहवालानुसार माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाची दप्तरे वाटप केली जात असतानाही संबंधित प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यास जबाबदार असणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. खरेदी केलेल्या दप्तरांपैकी ४ टक्के दप्तरे फाटल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणात चौकशी करण्यात आलेली असून चौकशी अहवालानुसार ४ टक्के दप्तरे फाटल्याचे निष्पन्न झाल्याने संबंधित ठेकेदाराकडून सर्व फाटलेली दप्तरे बदलून नवीन दप्तरे विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील गाढी नदीचे पाणी सांडपाण्यामुळे प्रदुषित झाल्याबाबत

**(५) * ७५४२८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील वाढत्या नागरिकरणामुळे गाढी नदीच्या आसपासच्या परिसरात विकासकाने इमारती उभारताना ड्रेनेज सांडपाणी वाहून जाण्याचे योग्य ते नियोजन केले नसल्याने भूमीगत गटारातून सांडपाणी नदीत सोडल्यामुळे नदी प्रदुषित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार रेती उपसामुळे पाणी प्रदूषित होत असून सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व गाढी नदीतील प्रदुषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

पनवेल नगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेले सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एस.टी.पी.) कार्यान्वित आहे. तथापि, शहरातील काही भागाच्या जोडण्या भुयारी गटार योजनेस जोडणे बाकी असल्याने काही क्षेत्रातील सांडपाणी गाढी नदीत मिसळते.

(२)

- तहसिलदार, पनवेल यांनी गाढी नदी परिसरातून रेती उत्खननाकरीता कोणत्याही स्वरुपाची परवानगी दिली जात नसल्याबाबत तसेच रेती उपसाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.
- वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय पनवेल यांच्या अहवालानूसार गाढी नदीच्या आजूबाजूच्या परिसरात कोणतीही जलजन्य साथीचा उद्रेक झालेला आढळून आलेला नाही.

(३)

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पनवेल महानगरपालिकेस जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ अ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.
- नागरी घनकचऱ्याचे व सांडपाण्याचे नियमानूसार व्यवस्थापन करण्याबाबत सिडको, पनवेल विभाग यांनाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने समजपत्र दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापुर येथील शिवाजी विद्‌यापीठातील भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(६) * ८१८०९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील शिवाजी विद्‌यापीठातील सन २०१० ते २०१५ या कालावधीत विविध स्तरावरील भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराचा चौकशी अहवाल विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक, सोलापूर यांच्या एक सदस्यीय समितीने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान संचालक उच्चशिक्षण पुणे यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक ६ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्रश्न भाग-१ मधील नमूद अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालाची शासनस्तरावरून तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड किल्ल्यावर वृक्षारोपणाच्या उपक्रमातून लागवड केलेल्या वृक्षांचे योग्य संगोपन न झाल्याबाबत

**(७) * ७४०५४ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड किल्ल्यावर कोकण विभागीय आयुक्तांनी गत वर्षी जुलै महिन्यात वृक्षारोपणाच्या उपक्रमातून लागवड केलेल्या औषधी गुणधर्म असलेल्या १६ हजार झाडांपैकी फक्त ५०० झाडे जिवंत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षांच्या देखभालीसाठी स्थानिकांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने रोजंदारीवर काम करणाऱ्या स्थानिक कामगारांनी रोजगार हमी योजनेतून मिळणाऱ्या मानधनात दुप्पटीने वाढ करण्याची मागणी मान्य न झाल्यामुळे उक्त वृक्षांची देखभाल व संगोपनाकडे दुर्लक्ष केल्याने वृक्ष करपली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षांच्या देखभालीकरिता पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे वृक्षांच्या संगोपनाच्या उपाययोजनाचा प्रस्ताव प्रांताधिकारी यांना देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्या ठिकाणी पुन्हा वृक्षारोपण करण्याकरिता व संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विल्होळी (जि. नाशिक) येथील खत प्रकल्पातील रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे वालदेवी नदी प्रदूषित झाल्याबाबत

**(८) * ८०३४६ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विल्होळी (जि. नाशिक) येथील खत प्रकल्पामुळे रसायन मिश्रित पाणी वालदेवी नदीमधून वाहत असल्याने पाणी प्रदूषित झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व नदी शुध्दीकरणाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) व (३)

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नाशिक महानगरपालिकेस दिनांक २५/०१/२०१७ रोजी जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ अ नूसार निर्देश दिले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या स्थळभेटीत लिचेल ट्रिटमेंट प्लाँट चे नुतनिकरणाचे काम पूर्ण झाले असून त्यातून प्रक्रियायुक्त वा अप्रक्रियायुक्त लिचेट बाहेर जाताना आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात ग्रामीण भागातील नागरिकांना शुध्द पाणी मिळत नसल्याबाबत

**(९) * ८०८२३ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागातील नागरिकांना शुध्द पाणी मिळावे यासाठी कोटयवधी रुपये खर्चून योजना राबविण्यात येत असतानाही जलस्त्रोत व पाणी शुध्दीकरणासाठी उपाययोजना करण्यात येत नसल्यामुळे तेथील नागरिकांना शुध्द पाणी मिळत नसून अदयापही १० टक्के गावातील लोकांना अशुध्द पाणी प्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्हयातील नेवासा तालुक्यासहित ९९ गावातील पाण्यात हानीकारक जीवाणू असल्याने सदर पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल नगर जिल्हा परिषदेला प्राप्त झाला असल्याने या गावांमधील जलशुध्दीकरण योजना अंमलात आणण्याच्या शासन आदेशाची अंमलबजावणी अजूनही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त तालुक्यातील सुमारे १७ गावात पिण्याचे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारी टी.सी.एल. पावडर उपलब्ध नाही तर ४३ गावात क्लोरिनचे प्रमाण २०% पेक्षाही कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावांना शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत तसेच टी.सी.एल. पावडर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अशंत: खरे आहे.

अहमदनगर जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांचेमार्फत वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी व कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार माहे जानेवारी, २०१७ मध्ये १६७७ पाणी स्त्रोताचे पाणी नमुने तपासण्यात आले. त्यापैकी १२३ पाणी नमुने दुषित आढळून आले आहेत.त्याची टक्केवारी ७.३३ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये नेवासा तालुक्यातील ३९ पाणी नमुने जैविक तपासणीसाठी पाठविले असता ८ दुषित आढळून आले. जिल्हयातील १६७७ पाणी नमुने तपासणीसाठी पाठविले असता १२३ पाणी नमुने दुषित आढळुन आले आहे.

अहमदनगर जिल्हयातील ४३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे स्त्रोत भूपृष्ठावरील पाण्यावर आधारित आहेत. अशा योजनांमध्ये जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करण्यात आली आहे व १३७७ स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत भुपृष्ठाखालील पाण्यावर आधारित आहेत अशा गावांसाठी जलशुध्दीकरण करण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत टी.सी.एल. पावडर वापरण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये अहमदनगर जिल्हयातील १० गावांत पिण्याचे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारी टी.सी.एल. पावडर उपलब्ध नसल्याचे आढळुन आले आहे तर २७ गावांतील टी.सी.एल. पावडरमध्ये क्लोरीनचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आढळुन आले आहे. माहे जानेवारी, २०१७ मध्ये नेवासा तालुक्यातील सर्व गावांमध्ये टी.सी.एल. पावडर उपलब्ध होती. त्यापैकी फक्त धनगरवाडी या गावातील टी.सी.एल. पावडरमध्ये क्लोरीनचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे आढळुन आले.

(४) याबाबत जिल्हा परिषद स्तरावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या दरमहा होणा-या समन्वय सभेमध्ये आढावा घेण्यात येतो. तसेच दुषित पाणी नमुने आढळून आलेल्या गावाची माहिती गट विकास अधिकारी यांना पाठविण्यात येते. क्लोरीन कमी असलेल्या व टी.सी.एल पावडर नसलेल्या ग्रामपंचायतींना नवीन टी.सी.एल खरेदी करण्याच्या सूचना देण्यात येतात. खरेदी केलेले टी.सी.एल जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यात येते. पाणी नमुने दुषित आलेल्या स्त्रोतांचे पाणी संबंधित यंत्रणेमार्फत योग्य त्या उपाययोजना केल्यानंतर फेरतपासणीसाठी पाठविण्यात येते. सदर पाणी पिण्यास योग्य असल्याची खात्री केल्यानंतर पाणी पुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील माउंट कार्मेल कॉन्व्हेंटद्वारा आयोजित फुड फेस्टीव्हलमध्ये विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा

**(१०) * ७८५३४ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील माउंट कार्मेल कॉन्व्हेंटद्वारा आयोजित फुड फेस्टीव्हलमध्ये १५० विद्यार्थ्यांना अन्नातुन विषबाधा झाल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फुड फेस्टीव्हलच्या आयोजनाकरीता कॉन्व्हेंटच्या व्यवस्थापनाने प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रती रूपये ४० रूपये शुल्क आकारले असुन त्या खादयअन्नाचे कंत्राट एका खाजगी व्यक्तीला देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या खादयअन्नाच्या पदार्थामध्ये भेसळ करणा-या दुकानावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही. सदर प्रकरणी अन्नातून विषबाधा झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात केळी व आंबे पिकवण्यासाठी कॅल्शिअम कार्बाईडचा वापर होत असल्याबाबत

**(११) * ८१२०३ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील बहुसंख्य ठिकाणी कृत्रिमरित्या केळी व आंबे पिकवण्यासाठी घातक कॅल्शिअम कार्बाईडचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने केळी व आंबे पिकविणा-या वखारींची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कृत्रिमरित्या केळी व आंबे पिकवण्यासाठी घातक असलेल्या कॅल्शिअम कार्बाईडचा वापर होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) कोल्हापूर जिल्हयात ०६ ठिकाणी अन्न व औषध प्रशासनामार्फत तपासणी करण्यात आली. सदर एकाही ठिकाणी कृत्रिमरित्या केळी व आंबे पिकवण्यासाठी घातक कॅल्शिअम कार्बाईडचा वापर होत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंचाळी, आगवण व जांभूपाडा (जि.पालघर) या गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१२) * ८३१८६ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचाळी, आगवण व जांभूपाडा (जि.पालघर) या अनुसूचित जाती व जमातीची बहुसंख्येने लोकवस्ती असलेल्या ग्रुप ग्रामपंचायतीच्या गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अद्यापि पाणीपुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठ्याविषयी ग्रुप ग्रामपंचायतीने जीवन प्राधिकरणाकडे अनेक वेळा तक्रार करुनही त्याची दखल घेतली गेलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे. पालघर व २६ गावे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत पंचाळी गावाचा समावेश असून सदर योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत झाले आहे. सदर योजना जुलै, २००९ मध्ये कार्यान्वित झाल्यानंतर पालघर नगरपरिषद व जिल्हा परिषदेमार्फत संयुक्तरित्या चालविण्यात येते. पंचाळी, आगवण व जांभूपाडा यांना पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर जांभूपाडा येथील उच्च क्षमतेच्या विंधन विहीरीवरुन नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहे.

(२) व (३) पालघर व २६ गावे या प्रादेशिक योजनेत समाविष्ट असलेली पाईपलाईन कालबाह्य झाल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम होत होता. त्यामुळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या तक्रारीची दखल घेऊन जिल्हा परिषदेने जुनी पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण केले असून दिनांक २५.०२.२०१७ पासून पंचाळी गावास पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमधून रसायनमिश्रित पाणी नाल्यात सोडले जात असल्याबाबत

**(१३) * ७५२१८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या पश्चिम विभागातील मोरीवली गावच्या परिसरालगत औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या कारखान्यांमधून रसायनमिश्रित दूषित सांडपाणी प्रक्रिया न करताच पाणी निवासी वसाहतीलगत असलेल्या नाल्यात सोडले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवासी यांनी महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाव्दारे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने रसायनमिश्रित दूषित सांडपाणी औद्योगिक वसाहतीतून निवासी वसाहतीनजीक असलेल्या नाल्यात सोडणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर ठिकाणाची पाहणी करण्यात आली असता संमतीपत्रातील अटींचे पालन न करणा-या ७ उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे.
त्याचप्रमाणे नियमित भेटींच्या वेळी संमतीपत्रातील अटींचे पालन न करणा-या ६ उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील साईराम डाईंगमधुन निघणा-या विषारी वायुमुळे होत असलेले प्रदूषण

**(१४) * ८१३०३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील भंडारी चौक नारपोली साईराम डाईंगमधुन निघणा-या विषारी वायु आणि प्रदुषणामुळे येथील स्थानिक नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी होत असलेल्या प्रदूषणामुळे साईराम डाईंग नागरी वस्तीच्या बाहेर नेण्याची मागणी देखील होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कंपनीवर कारवाई करण्याबाबत व उक्त कंपनी शहराबाहेर स्थलांतरीत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सदर उद्योगास भेट देऊन पाहणी केली असता काही बाबींचे अनुपालन न झाल्याचे आढळून आले, त्यानुसार दिनांक ०१.०३.२०१६ रोजी या कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजवण्यात आली आहे. मात्र सद्य:स्थितीत कंपनीची हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुरु आहे. त्यामुळे कंपनीच्या स्थलांतराचा अथवा विलंबाचा प्रश्न् उद्भवत नाही.

-----------------

## मिरज (जि. सांगली) येथे अवैध सुगंधी तंबाखू, सुपारी व गुटखा पावडर जप्त केल्याबाबत

**(१५) * ७७४७७ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (सांगली) येथील स्टेशन चौकात अन्न औषधे प्रशासन विभागाने व पोलीसांनी एम.एच.२४ एबी ७६२४ या ट्रकवर छापा टाकून अवैध सुगंधी तंबाखू, सुपारी व गुटखा पावडर असे सुमारे रूपये ५२ लाखांचे गुटखाजन्य पदार्थ जप्त केल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे आरग (ता.मिरज) येथे गुटखा तयार करणाऱ्या कारखान्यावर माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकला असता लाखो रुपयांचा गुटखा व साहित्य सापडल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मिरज, जि. सांगली येथील स्टेशन चौकात अन्न व औषध प्रशासन विभागाने व पोलीसांनी दि. २३/१२/२१६ रोजी एम.एच.२४ एबी ७६२४ या ट्रकवर छापा टाकून अवैध सुगंधी तंबाखू, सुगंधित सुपारी व पांढऱ्या रंगाची पावडर अशा प्रतिबंधित अन्नपदार्थाचा रू. ५२,३६,०००/- चा साठा जप्त केला आहे.

(२) सदरचा छापा केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाने टाकला असुन संपूर्ण कारवाई त्यांनी घेतली आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाने मिरज, जि. सांगली येथे केलेल्या कारवाईप्रकरणी जप्त करण्यात आलेल्या पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते. सदर नमुन्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाला असून, नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

मौजे आरग, ता. मिरज, जि. सांगली येथे केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाने घेतलेल्या कारवाईत त्यांनी जप्त केलेला प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा अन्न व औषध प्रशासनाच्या ताब्यात देण्याची विनंती प्रशासनाव्दारे केंद्रीय उत्पादन शुल्क विभागास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी धरणामध्ये पुणे जिल्हयातील कारखान्यांमधून दूषित पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(१६) * ८२२५७ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी धरणामध्ये पुणे जिल्हयातील कारखान्यांमधून दुषित व घातक रासायनिक पाणी सोडले जात असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे तसेच मत्स्य उत्पादन कमी झाले असून फ्लेमिंग व इतर विविध जातींचे पक्षी जीवनही धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने या दुषीत पाण्यामुळे उजनी धरणाकाठच्या गावांतील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळण्याकरिता तसेच दुषित व घातक रासायनिक पाणी सोडणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.बाऱ्हाळी (ता. मुखेड जि.नांदेड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१७) * ८२९७६ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. बाऱ्हाळी (ता. मुखेड,जि. नांदेड) येथे सन २०११-२०१२ या कालावधीमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत २ कोटी ९३ लक्ष रुपयाची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या कामाचा कालावधी पूर्ण होऊनही अद्याप कामे अपूर्ण असून सदर योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे करून अनियमितता व गैरव्यवहार करण्यात आला असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुखेड) यांनी दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. पाणी पुरवठा मंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या तिसरा हप्त्याचा रूपये ९० लक्षचा धनादेश प्रथम ग्राम पंचायत खात्यावर जमा करुन नंतर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर जमा करणे आवश्यक असतानाही उपअभियंता, शाखा अभियंता, कंत्राटदार व समिती यांनी संगनमताने सदर रक्कम थेट पाणीपुरवठा समितीच्या खात्यावर जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व उक्त गावाला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) व (३) सदर योजनेचे काम पूर्ण करुन दिनांक १५.१२.२०१६ पासून नियमित पाणी पुरवठा सुरु आहे.

पाणी पुरवठा समितीने सदर योजनेचा प्राप्त झालेला धनादेश ग्रामपंचायत खात्यात वर्ग न करता थेट समितीच्या खात्यावर जमा केलेला आहे. सदर बाब आर्थिक अनियमिततेत मोडत असली तरी कामात भौतिकदृष्ट्या कोणतीही अनियमितता झालेली नसून झालेल्या कामाचे मूल्यांकन हे वितरीत निधीच्या प्रमाणात आहे.
(४) सदर योजनेच्या अनियमिततेबाबत उप अभियंता यांची समिती गठीत केली असून सदर समितीच्या चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे. तथापि उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेचे काम पूर्ण करुन दिनांक १५.१२.२०१६ पासून गावास सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकपुर्णा पाणीपुरवठा योजनेच्या पाईप खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * ८१५८३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या खडकपुर्णा पाणीपुरवठा योजनेच्या पाईप खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून निकृष्ठ दर्जाचे पाईप खरेदी केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, उपरोक्त पाईप खरेदी मध्ये गैरव्यवहार करणा-या संबंधीतांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि. यवतमाळ) येथील क्रीडा संकुलाच्या विविध कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) * ७७८१५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि. यवतमाळ) येथील क्रीडा संकुलाच्या विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहारात दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक. ७ जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांनी आर्णी तालुका क्रीडा संकुल बांधकामातील गैरव्यवहाराची चौकशी करून या कामात झालेल्या गैरव्यवहाराचा अहवाल जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणाची चौकशी करुन त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उपविभागीय अधिकारी (महसूल) यांनी सादर केलेल्या दिनांक १४.०१.२०१६ च्या अहवालावर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी पुन्हा चौकशी करण्याचे निर्देश दिले त्यानुसार उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ, विविध खेळाच्या संघटना, वास्तुशिल्प तज्ञ व संबंधित कंत्राटदार, जिल्हा क्रीडा अधिकारी, यवतमाळ यांचेसह पुन:श्च मोजमाप पुस्तिका, सी.सी., प्रत्यक्ष झालेल्या कामाची व देयकाची एकत्रित तपासणी केली व त्यानुसार दि.१४.०३.२०१६ रोजी अहवाल सादर केला. यासदंर्भात माहिती अधिकारांतर्गत चुकीची माहिती दिल्यामुळे गैरसमजातून अपहार झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याचे निष्पन्न झाले, संबंधित क्रीडा अधिकारी यांना यापुढे चुकीची माहिती न देण्याच्या सुचना दिल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोट (जि.अकोला) तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात धान्य वाटपाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२०) * ८२९५२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात विविध योजनांमध्ये दरमहा धान्य वाटपाच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरगरीब व गरजू लोकांना दिले जाणारे धान्य अधिकारी, कर्मचारी व स्वस्त धान्य दुकानदारांमधील संगनमताने व्यापा-यांना पुरविले जात होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत अधिकारी, कर्मचारी व व्यापारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय वा कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

अकोट तालुक्यात शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात आलेले धान्य योग्य प्रमाणात मिळत नसल्याची कुठलीही तक्रार प्राप्त झाली नाही वा अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील ग्रामीण भागात झालेली पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत**

**(२१) * ८०५७८ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील पालसई ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेली जलस्वराज्य तर असनस व कळंभई येथे महाजल (भारत निर्माण) या योजनेतून नळ पाणीपूरवठा योजना मंजूर करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही योजनांची कामे नियमबाह्य व निकृष्ट दर्जाची झाली असून प्रचंड निधी खर्च करुनही योजना कार्यान्वित न झाल्यामुळे नागरिकांची पाण्यासाठी वणवण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर जिल्हयात नदी-नाल्यातील पाणी आटल्याने तसेच विहिरी व बोरिंगच्या पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी संबंधित अधिका-यांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त दोन योजना तातडीने सुरु करण्याबाबत तसेच पालघर जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) नाही, हे खरे नाही. पालसई योजना दिनांक ८.०२.२०११ रोजी ग्रामपंचायतीला हस्तांतरीत केली असून जुलै, २०१६ पर्यंत या योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु

होता. मौजे असनस व कळंभई या योजनांची कामे भौतीक दृष्टीने पूर्ण झालेली असून त्याची चाचणी झाली आहे. तथापि तत्कालीन ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व सध्याची ग्रामपंचायत यांच्यामध्ये वाद होऊन ग्रामपंचायतीने कामाबाबत तक्रार केली आहे. विद्युतदेयके, देखभाल दुरुस्ती व हस्तांतरण वादामुळे या योजना सध्या बंद आहेत. मात्र ग्रामस्थांना अस्तित्वातील इतर उपाययोजनांद्वारे पाणी पुरवठा होत असून अद्यापपर्यंत टंचाईसदृष्य परिस्थिती उद्भवलेली नाही वा टँकरची मागणीही करण्यात आलेली नाही.

(३) नाही.

(४) वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी पाणी टंचाईची पाहणी केली असून त्यांच्या अहवालानुसार एप्रिल ते जून, २०१७ या कालावधीत जिल्ह्यात पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. त्यानुसार संभाव्य पाणी टंचाई कालावधीत तालुका स्तरावरुन राबवावयाच्या उपाययोजनांचे आराखडे तयार करण्यात आले असून जिल्ह्याचा आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पालघर यांच्या स्तरावर सुरु आहे. तसेच बंद पडलेल्या उपरोक्त योजनांबाबतचा वाद मिटविण्यासाठी व योजना तातडीने सुरु करण्यासाठी सातत्याने ग्राम पंचायतीकडे पाठपुरावा सुरु आहे. यासंदर्भात पंचायत स्तरावर दिनांक १९.०१.२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली असून ग्रामपंचायतीला आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत गणित, विज्ञान साहित्य पेट्या खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२२) * ७८८८९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सन २०१५-१६ या वर्षात ९१ कोटी ५३ लाख रुपये किंमतीच्या गणित, विज्ञान साहित्य पेट्या खरेदी केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी केलेल्या प्रत्यक्ष पेटीतील साहित्य हे निकृष्ट दर्जाचे निघाल्याने याबाबतची चौकशी करण्याची मागणी सामाजिक संघटनेने तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या खरेदी केलेल्या प्रत्येक पेटीची किंमत काय होती, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रत्येक पेटीची किंमत रु.१०,१०७/- इतकी होती. उद्योग विभागाच्या दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे तंतोतंत पालन करण्यात आले असल्याने चौकशीची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील हॉटेल उद्योगांकडून सेवाशुल्क आकारले जात असल्याबाबत**

**(२३) * ७४१८८ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शरददादा**

**सोनावणे (जुन्नर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण मंत्रालयाने देशातील सर्व ग्रेडच्या हॉटेलकरीता सेवाशुल्क ऐच्छिक असल्याची सूचना देण्यात आली होती परंतु राज्यातील हॉटेल उद्योगांकडून सेवाशुल्क आकारले जात असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट संघटनेने सेवाशुल्क ऐच्छिक सुचनेला विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी राज्यातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट यांनी करण्याकरीता राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) याबाबत अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार मंच, ठाणे यांच्याकडे एक तक्रार प्राप्त झाली आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या दि. १४.१२.२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागांना उचित कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, वित्त विभाग व अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत येणारे नियंत्रक, वैधमापन शास्त्र विभाग व प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना उचित कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मौजे नांदीवडे, (ता. जि. रत्नागिरी) येथील जे.एस.डब्ल्यु. एनर्जी लिमिटेड या कंपनीच्या दूषित पाण्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(२४) * ७९८२९ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांदीवडे (ता. जि. रत्नागिरी) येथील जे.एस.डब्ल्यु. एनर्जी लिमिटेड या

वीज निर्मिती कंपनीच्या दूषित पाण्याच्या कॅनॉलमुळे मौजे कुणबीवाडी (जयगड) (ता., जि. रत्नागिरी) येथील गट नं. ४७/१, ४७/३ या शेतांचे व परिसरातील इतर शेतकऱ्यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाण्याच्या कॅनॉलमुळे नागरिकांच्या जिवितासही मोठया प्रमाणात धोका निर्माण झाला आहे व संबंधीत शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली व उक्त कंपनीविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

- मे.जे.एस.डब्लू एनर्जी प्रा. लिमिटेड या वीजनिर्मिती कारखान्यातून कुलिंग टॉवरचे थंड केलेले पाणी कॅनॉलद्वारे समुद्रात सोडण्यात येते.
- कॅनॉलच्या दोन्ही बाजूस पीकलागवडीची शेतजमीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवाजी शिक्षण संस्थेच्या अकोला येथील महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल करण्यात येत असल्याबाबत

**(२५) * ७४०५२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी शिक्षण संस्थेच्या अकोला येथील शिवाजी विज्ञान, वाणिज्य, कला महाविद्यालयात एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क राज्य शासन भरत असतानाही महाविद्यालयाचे

प्राचार्य प्रवेश घेताना शिक्षण शुल्काच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारीत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी सहायक समाजकल्याण आयुक्तालयाकडे प्रत्यक्ष भेटून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार करुन उपोषणाला बसूनही दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून सदर बाब निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य व समाजकल्याण आयुक्त यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी प्रादेशिक आयुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती यांच्याकडून प्राप्त चौकशी अहवालावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-दापोडे (जि.ठाणे) परिसरातील गोदामामध्ये गहू व तांदळाचा अवैध साठा जप्त केल्याबाबत

**(२६) * ८२३३९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-दापोडे (जि.ठाणे) परिसरातील गोदामामध्ये लाखो रुपयांचा गहू व तांदळाचा अवैध साठा शिधावाटप अधिकाऱ्यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) भिवंडी-दापोडे (जि.ठाणे) परिसरातील गोदामामध्ये सुमारे रु.६३,३०,७००/- इतक्या किंमतीचा तांदुळ व गहू मुद्येमाल पोलीसांनी शिधावाटप अधिकाऱ्यांसमवेत दि.२३.१०.२०१६ रोजी जप्त केला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

-----------------

## घिवली (ता. जि. पालघर) या गावात पाणी पुरवठा होण्याबाबत

**(२७) * ८१९४६ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घिवली (ता. जि. पालघर) या गावात सन २०१५ पासून पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्याने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पालघर यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद, पाणी पुरवठा यांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पाहणी करुन पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा व नविन नळ जोडणीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावाला सुरळितपणे पाणी पुरवठा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत सन २०१६-१७ च्या कृती आराखड्यात घिवली (ता. जि. पालघर) गावासाठी नवीन योजनेचा समावेश असून, योजनेच्या रु.९६.३८ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास जिल्हा परिषद स्तरावर तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) सदर गावास योजना नुकतीच (म्हणजेच दि.३.०३.२०१७ रोजी) मंजूर झाली असल्याने, पुढील कामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील जी.टी.आणि जे.जे.हॉस्पिटल येथे मेडीकल सर्जीकल ॲन्ड हॉस्पिटल इक्विपमेंट या बनावट कंपनीच्या नावाने वैद्यकिय उपकरणांचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(२८) * ८३०११ डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जी.टी. आणि जे.जे हॉस्पिटल (मुंबई) येथे विनीत तुकाराम पिंगळे नावाचा इसम मेडीकल सर्जीकल ॲन्ड हॉस्पिटल इक्विपमेंट या कंपनीच्या नावाने विनापरवाना वैद्यकिय साहित्य अवैधरित्या साठवून विक्री करित असल्याचे अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांनी टाकलेल्या छाप्यात माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैद्यकिय साहित्य हे नांदेड येथील ऑसलेपॉयस इंटरप्रायजेस या कंपनीद्वारे विनापरवाना बनविले जात असून अन्न व औषध प्रशासनाने सदर कंपनीत छापा टाकून रुपये १.०७ कोटीचे वैद्यकिय साहित्य जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीकडे कोणताही परवाना नसतांना राज्यातील २२ स्टॉकिस्टना वैद्याकिय साहित्याचा पुरवठा केला जातो तसेच सदर कंपनीला राज्य शासनाचे अधिकृत पुरवठादार म्हणून गुजरात येथील शर्मा सर्जिकल ॲण्ड इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने नियुक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबईतील जी.टी.रुग्णालयातील विनापरवाना अस्थिव्यंग रोपण सामुग्री सापडल्यानंतर राज्यभरातील २२ ठिकाणी यासंदर्भात विनापरवाना काम सुरु असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासामध्ये माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील नाशिक, यवतमाळ, बीड, अहमदनगर, नांदेड, पुणे या भागात १० ते १२ ठिकाणी छापे टाकण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे. ऑसलेपॉयस इंटरप्रायजेस, नांदेड ही संस्था ऑर्थोपॅडीक इम्प्लांट उत्पादन करणारी कंपनी नसून सदर संस्था ऑर्थोपॅडीक इम्प्लांट उत्पादन करणा-या मे. शर्मा ॲण्ड इंजिनिअरींग प्रा.लि., वडोदरा, गुजराथ व मे. ऑर्थो टेक इम्प्लांट विथ कॉन्फीडन्स, वलसाड, गुजराथ या संस्थेचे अधिकृत विक्रेता म्हणून घाऊक विक्री विनापरवाना करीत असल्याचे प्रशासनाव्दारे करण्यात आलेल्या तपासणीत निदर्शनास आले. अन्न व औषध प्रशासनाव्दारे मे. ऑसलेपॉयस एंटरप्रायजेस, नांदेड या पेढीवर तसेच त्यांनी अस्थिव्यंग सामग्रीचा पुरवठा केलेल्या २२ विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांच्याकडील अंदाजे १ कोटी ७ लाखाचा ऑर्थोपॅडीक इम्प्लांटचा माल जप्त करण्यात आला आहे.

(३) ऑसलेपॉयस एंटरप्रायजेस, नांदेड या पेढीकडून अस्थिव्यंग सामग्रीचा पुरवठा २२ विक्रेत्यांना केला जातो हे खरे आहे मात्र सदर कंपनीला राज्य शासनाचे अधिकृत पुरवठादार म्हणून गुजरात येथील शर्मा सर्जिकल ॲण्ड इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने नियुक्त केले आहे, हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) या प्रकरणी राज्यात ९ मार्च, २०१७ पर्यंत एकूण ३९ ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या आहेत.

(६) जी.टी.रूग्णालय, मुंबई येथे सापडलेल्या अस्थिव्यंग सामुग्रीबाबत अधिष्ठाता, सर ज.जी. रूग्णालय मुंबई यांनी चौकशी समिती नेमली आहे. तसेच आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेकडून ऑसलेपॉयस एंटरप्रायजेस, नांदेड या पेढीवर तसेच त्यांनी अस्थिव्यंग सामग्रीचा पुरवठा केलेल्या २२ विक्रेत्यांकडील अंदाजे १ कोटी ७ लाखाचा माल जप्त करून त्यांचेवर कारवाई सुरू आहे.

-----------------

**गोंदिया-भंडारा जिल्हयाच्या भूगर्भातील पाणी विषयुक्त असल्याबाबत**

**(२९) * ७६०२३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा, गोंदिया जिल्हयातील मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या खाणी कारखान्यातून निर्माण होणाऱ्या रासायनिक प्रदूषणामुळे भूगर्भातील जलसाठा विषयुक्त होत असून त्यामुळे शेतजमिनीचा पोत खालावत असल्याची बाब हैद्राबाद येथील इंटरनॅशनल जर्नल ऑफ लाईफ सायन्सेस बायोटेक्नॉलॉजी ॲण्ड फार्मा रिसर्च (आयजेएलबीपी-आर) या संस्थेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रदूषणामुळे झालेले दुष्परिणामावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, गोंदिया व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त अहवालानुसार संबंधितांना नमूद अहवाल वा सदर बाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.